स्वातंत्र्य सैनिक संघटनेने केली

दक्षिणेतील इतर मागास संघातील आमदारांचे शेकडो पाठीराखे प्रयत्नशील

# बारावी परीक्षा निकाल

(पान १ वरून)

विद्यार्थी अमोल अरुण इनामदारने (७८.३३ टक्के), कला शाखेत रत्नागिरीच्या फाटक हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या श्रुती दिलीप लाडने (६९.१७) तर वाणिज्य शाखेत कोल्हापूरच्या कमला कॉलेजची विद्यार्थिनी कल्पना बाबुराव कांबळे (६१ टक्के) हिने सर्वाधिक गुण मिळवून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे.

बारावी परीक्षेत जिल्हानिहाय उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी अशी - सातारा ११.६८, सांगली ११.८९, कोल्हापूर १४.०३, रत्नागिरी १६.५४, सिंधुदुर्ग १४.१७. परीक्षेला बसलेल्या ३ हजार २९८ मुलींपैकी ५१९ मुली उत्तीर्ण झाल्या असून, त्यांचे उत्तीर्णतेचे शेकडा प्रमाण १६.०३ इतके आहे. तर मुलांचे उत्तीर्णतेचे शेकडा प्रमाण १२.३६ इतके आहे.

## गुणपडताळणी

ऑक्टोबर १९९४ मध्ये इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना संपादित गुणांची पडताळणी करायची झाल्यास त्यांनी त्यांच्या विहित नमुन्यातील अर्ज संबंधित माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत अथवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत दि. २९ डिसेंबर १९९४ पर्यंत प्रत्येक विषयास वीस रुपये या विर्धारित शुल्कासह विभागीय मंडळ कार्यालयाकडे पाठवायचे आहेत.

ऑक्टोबर १९९४ च्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मार्च १९९५ च्या परीक्षेस बसायचे असल्यास त्यांनी त्यांची आवेदनपत्रे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे अथवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे नियमित शुल्कासह दि. २२ डिसेंबर १९९४ पर्यंत व विलंब शुल्कासह दि. २ जानेवारी १९९५ पर्यंत सादर करायची आहेत.